**महाराष्ट्र शासन**

# सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई

**एलफिन्स्टन तंत्र शिक्षण विद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१**

**Email :jdhemumbai@gmail.com** **फोन व फॅक्स क्र. ०२२-२२६५६६००**

जा.क्र. ससं/उशि/मुंवि/परीक्षा शुल्क/२०२४/१६१० दिनांक :०१.०३.२०२४

**तात्काळ ईमेलद्वारा**

प्रति,

१. संचालक / प्राचार्य,
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित,
विना अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये,

२. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
मुंबई - ४०० ०३२.

३. कुलसचिव, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

४. कुलसचिव, महाराष्ट्र विधी विद्यापीठ,
मुंबई.

**विषय : सन २०२३-२४ मध्ये दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत...**

**संदर्भ : १. शालेय शिक्षण विभाग शा.नि. क्र.एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५ दि.११.१०.१९९३**
**२. महसूल व वन विभाग शा.नि.क्र. एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७,दि.१०.११.२०२३**
**३. शासन निर्णय क्रमांक: एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.१६.०२.२०२४**
**३. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-परीक्षा शुल्क-२०२३-२४/I/२८३५२६/२०२४ दि.२३.०२.२०२४**

उपरोक्त विषय व संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षामंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये अकृषि विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे. आता संदर्भिय शासन निर्णय क्रमांक ३ नुसार, राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्याव्यतिरिक्त इतर तालुक्यामधील ज्या महसूली मंडळामध्ये जून ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत सरासरी पर्जन्याच्या ७५ टक्के पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मि.मि पेक्षा कमी झाले आहे. अशा वर नमूद दि.१०.११.२०२३ च्या शासन निर्णय सोबतच्या परिशिष्ट "अ" येथे नमूद केलेल्या एकूण १०२१ महसूली मंडळापैकी ज्या मंडळाचे विभाजन होऊन नवीन महसूली मंडळ स्थापन करण्यात आलेली आहेत आणि त्या महसूली मंडळात अद्याप प्रस्तावामधील या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेली २२४ नवीन महसूल मंडळे देखील दुष्काळ सदृश्य मंडळे म्हणून घोषित करून या महसूली मंडळाकरिता खालील सवलती लागू करण्यास शासनाची मंजूरी देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळसदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केली आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयातील दुष्काळसदृश्य तालुक्यातील विदयार्थ्यांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात याव्यात-

१. संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदनपत्रे विद्यापीठाकडे संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर सांक्षाकिंत करुन पाठवावे.

२. सद्यस्थितीत विद्यापीठांचे पहिले शैक्षणिक सत्र संपलेले असल्याने महाविद्यालयाने त्यांचे महाविद्यालयात सन २०२३-२४ च्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या

रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदन पत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी.

३. तसेच विद्यापीठाने आपल्याकडे प्राप्त झालेल्या सन २०२३-२४ च्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आलेल्या आवेदन पत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी.

४. महाविद्यालयाने सोबतच्या **विवरणपत्र अ** मध्ये अचूक माहिती आवश्यक कागदपत्रासह सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे सादर केल्यानंतर सदर योजनेसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल व संबंधित रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यात येईल.

५. कोणत्याही परिस्थितीत दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासुन वंचित राहणार नाही. याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ. हरिभाऊ ब. शिंदे)
सहसंचालक
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई

I/283526/2024

## विवरणपत्र - अ

**सन 2023-24 च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशिलाचे विवरणपत्र.(रक्कम रुपयात)**

| अ.क्र. | सन 2023-24 च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | सन 2023-24 च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपुर्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |

स्वाक्षरी